रयत शिक्षण संथेचे,

अण्णासाहेव आवटे आर्ट्स, कॉमर्स & हुतात्मा बाबू गेनू सायन्स कॉलेज,मंचर

मराठी विभाग

मराठी भाषा गौरव दिन

अहवाल – २०२५-२६

अहवाल

दि. २६.०२.२०२६

महाविद्यालयातील मराठी विभागांतर्गत कविवर्य कुसुमाग्रज उर्फ वि.वा.शिरवाडकर यांचा जन्मदिवस **"मराठी भाषा गौरव दिन" म्हणून** दि.२६ फेब्रुवारी २०२६ रोजी महाविद्यालयात साजरा करण्यात आला. याप्रसंगी कविवर्य कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच मराठी विभागाच्या वतीने कविवर्य कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त विशेष "उन्मेष" या भित्तिपत्रकाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे डॉ. पी.एन.गायकवाड, प्रा. अनिल निघोट , डॉ. गीता शिंदे, प्रा. नितीन बाणखेले यांच्या हस्ते करण्यात आले.

मराठी विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यात डॉ. पी.एन.गायकवाड यांनी समाजात घडणाऱ्या घडामोडी व बदलती भाषा यावर भाष्य करून मातृभाषेबरोबर बोलीही टिकल्या पाहिजेत असे संगितले. या प्रसंगी डॉ. अनिल निघोट लिखित ८ पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. तसेच या वेळी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा दिनानिमित्त घेण्यात आलेल्या स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या प्रसंगी मराठी विभागप्रमुख प्रो.डॉ.गार्डी बी.पी.,प्रा.भवारी सी. बी., प्रा. मुंढे जी.डी.व प्रा.झावरे सी. ए. प्रा. केंगले ए. के. व महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन.एस.गायकवाड करताना





"उन्मेष" या भित्तिपत्रकाच्या उद्घाटन प्रसंगी उपस्थित प्रमुख पाहुणे आणि मान्यवर





प्रमुख पाहुणे यांचा सत्कार करताना मा. प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड





प्रमुख पाहुणे उपस्थित विद्यार्थांना मार्गदर्शन करताना









मान्यवरांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देताना